# मराठी भाषा इंग्रजी पेक्षा श्रेष्ठ

जगामध्ये इंग्रजी जाणणाऱ्या लोंकाची संख्या हिंदीच्या खालोखाल आहे, इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे. इंग्रजी वर प्रभुत्त्व असणाऱ्या लोकांचे विश्व मोठे आहे. इंग्रजी वर प्रभुत्त्व असणाऱ्या लोकांना जागतिक स्तरावर रोजगार धंद्याची संधी खूपच आहे. इंग्रजी वर प्रभुत्त्व असणाऱ्या लोकांना अमेरिका, कॅनडा, ग्रेट ब्रिटन, मध्य पूर्व, ऑस्ट्रेलिया तसेंच कांही आफ्रिकी देशामध्ये मान मिळतो. हे आणि असेच कांही मुद्दे वादातीत आहेत. परंतु, म्हणून भारतातील प्रत्येक व्यक्तीने इंग्रजीवर प्रभुत्त्व मिळवले पाहिजे हे हास्यास्पद आहे.

भारतातील प्रत्येक व्यक्तीला परदेशात काम धंद्याला जाण्याची गरज नाही. भारतातील प्रत्येक व्यक्तीला फक्त इंग्रजीतच उपलब्ध असलेल्या ज्ञानाची आवश्यकता नाही. सध्याच्या संगणक युगामध्ये ज्या गोष्टीचे ज्ञान मराठी मध्ये सध्या नाही परंतु, बऱ्याच लोकाना ते दिले पाहिजे, असे ज्ञान मराठी मध्ये उपलब्ध करून देणे सहज शक्य झाले आहे. तेंव्हा निवडक लोकाना इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक आहे, परंतु सर्वाकरता गरजेचे नाही. या तत्त्वाचा स्वीकार करणे वादातीत असावे. हे निवडक लोक किती असावेत याचा आडाखा बनवणे अवघड नाही. माझ्या अंदाजाने हा आकडा १० टक्क्यापेक्षा कमी असावा. तेंव्हा निरनिराळ्या स्तरातील १० ते २० टक्के व्यक्तीना इंग्रजीत प्राविण्य मिळवण्यास प्रोत्साहन द्यावे व बाकीना मराठी मध्ये प्राविण्य मिळवण्यास मदत करावी.

या योगे आपला शिक्षणावरचा खर्च कमी होऊ शकतो, आपली अस्मिता जपू शकतो, आपले संस्कार नविन पिढीला देऊ शकतो आणि यातून जगामध्ये आपली ओळख निर्माण करू शकतो. तेंव्हा सर्व मराठी भाषकानी एकमुखाने म्हणू या "मराठी भाषेचा विजय असो"